राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३७४२ / २०२४ / सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| युवराज शंकर निकम | १)कार्यकारी अभियंता,<br>टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी<br>२) उपविभागीय अभियंता, कण्हेर कालवे उपविभाग क्र. १०, कडेपूर (ओगलेवाडी) | अधीक्षक अभियंता,<br>सांगली पाटबंधारे मंडळ,<br>सांगली |

**( सुनावणी दिनांक - १७ / ११ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. १९.०६.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| ०५.०४.२०२४ | पलूस तलाव आंधळी रोड, बांधकाम तलावाच्या कामाचे स्टेटमेंट, कामाची वर्क ऑर्डर, टेंडर, डिझाईन, अदा करण्यात आलेल्या बिलाची सर्व झेरॉक्स प्रती, टेंडर कामाची जाहिरात दिलेली पेपर नोटीस इ. प्रती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, " अपिलार्थी यांचा माहिती अर्ज दि.२२.०४.२०२४ रोजीच्या

पत्राने उपविभागीय अभियंता, कण्हेर कालवे उपविभाग क्र.१०, कडेपूर यांचेकडे हस्तांतरित केला आहे. तद्नंतर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, कण्हेर कालवे उपविभाग क्र.१०, कडेपूर यांनी माहिती अर्जास दि. ०९.०५.२०२४ रोजीच्या पत्राने उत्तर देवून माहिती अर्जात मागितलेली माहिती या कार्यालयाशी संबंधित नसल्याने माहिती निरंक असल्याबाबत कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि. २७.०६.२०२४ रोजीच्या पत्राने त्यांचे अपील अमान्य केले आहे."

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०९.०५.२०२४ रोजीच्या पत्राने उत्तर देवून माहिती निरंक असल्याचे कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून प्रथम अपील अमान्य केले आहे. प्रस्तुत प्रकरणात नियमाप्रमाणे कार्यवाही झाली आहे. अपिलार्थी सुनावणीकामी गैरहजर असल्याने त्यांचे म्हणणे एकूण घेता आले नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

जावक क्र. ३७४२ / २०२४ / सातारा 10844 /2025 दिनांक - 11/12/2025